लोकमत

# मत्स्योदरी अभियांत्रिकीमध्ये रक्तदान शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**जालना :** जालना शहरातील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये सोमवारी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व लायन्स क्लब छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास चांगला प्रतिसाद मिळाला.

शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात जवळपास ३३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी डॉ. गंगाधर केकान, श्यामराव सोनुने, बाबासाहेब कळमकर, शेषनारायण घुंगरड, पंकज भोयर, नंदकिशोर वाघ आदींची उपस्थिती होती. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापकांनी परीश्रम घेतले.

जालना
नायक



# मत्स्योदरी अभियांत्रिकीमध्ये रक्तदान शिबीर उत्साहात

**जालना ।** मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये कर्मयोगी स्व.एड. अंकुशराव टोपे साहेब यांच्या जयंतीनिमित्त दिनांक १८ सप्टेंबर २०२३ सोमवार रोजी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व लॉयन्स क्लब छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात ३३ रक्तदात्यांनी रक्तदान केले व तसेच विद्यार्थिनींचे हिमोग्लोबिन तपासण्यात आले.

यावेळी लॉयन्स क्लबचे डॉ. गंगाधर केकान, श्री. शामराव सोनुने, श्री. बाबासाहेब कळमकर, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. शेषनारायण धुंगरड, सर्व विभागप्रमुख, रा.से.यो. समन्वयक प्रा. पंकज भोयर, प्रा. नंदकिशोर वाघ तसेच प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

दैनिक सकारात्मक विचारांचे
# आनंद नगरी
जालना, औरंगाबाद, परभणी, हिंगोली, लातूर, बीड, नांदेड येथून एकाच वेळी एकत्रपणे प्रकाशित होणारे मराठी दैनिक

Wednesday 2023/09/20

## मत्स्योदरी अभियांत्रिकीमध्ये रक्तदान शिबीर

जालना- मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये कर्मयोगी स्व. ॲड. अंकुशराव टोपे यांच्या जयंतीनिमित्त दि.१८ सप्टेंबर सोमवार रोजी महाविद्यलयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व लॉयन्स क्लब छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिबिराचे उद्धाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिरात ३३ रक्तदात्यांनी रक्तदान केले व तसेच विद्यार्थिनींचे हिमोग्लोबिन तपासण्यात आले. यावेळी लॉयन्स क्लबचे डॉ. गंगाधर केकान, शामराव सोनुने, बाबासाहेब कळमकर, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. शेषनारायण घुंगरड, सर्व विभागप्रमुख, रा.से.यो. समन्वयक प्रा. पंकज भोयर, प्रा. नंदकिशोर वाघ तसेच प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

पुण्य नगरी

# मत्स्योदरी अभियांत्रिकीमध्ये ३३ जणांचे रक्तदान

**जालना/प्रतिनिधी**

मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये कर्मयोगी स्व. अंकुशराव टोपे यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (दि.१८) रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने व लॉयन्स क्लब छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराचे उदघाटन प्राचार्य डॉ.एस.के. बिरादार यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात महाविद्यालयातील ३३ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनींचे हिमोग्लोबीनही तपासण्यात आले. लायन्स क्लबचे डॉ. गंगाधर केकान, शामराव सोनुने, बाबासाहेब कमळकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.शेषनारायण घुंगरड, समन्वयक प्रा.पंकज भोयर, नंदकिशोर वाघ यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थ्यांची यावेळी उपस्थिती होती. रक्तदान शिबीराच्या सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभियांत्रीकी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.